KOKUYO

# KOKUYO ग्रूप आचारसंहिता पुस्तिका

# CODE OF CONDUCT

2023.04

भावी परिदृश्य

## स्वायत्त सहकारी संस्था

मूल्य

संवेदनशील सहनिर्मिती

प्रयोगात्मक संस्कृती

अनुभविक डिज़ाइन

उद्दिष्ट

## उत्तेजित भविष्यातील कार्य आणि जीवनाचे समन्वेषण.

दीर्घकालीन दृष्टी

## WORK & LIFE STYLE Company

"वन व्यवस्थापन मॉडल" मध्ये रूपांतर

कॉर्पोरेट तत्वज्ञान

# be Unique.

KOKUYO सृर्जनशीलतेला चालना देऊन
जगातील व्यक्तित्व उजळत राहील.



KOKUYO कंपनी लिमिटेडचे अध्यक्ष व प्रतिनिधी संचालक

**हिदेकुनी कुरोदा**

# TOP MESSAGE

KOKUYO ग्रुप काम आणि जीवनाच्या रोमांचक भविष्याच्या शोधासाठी वचनबद्ध आहे. या व्हिजन अंतर्गत, आम्ही दीर्घकालीन दृष्टी "CCC2030" स्थापन केली आहे आणि शाश्वतपणे वाढत असलेल्या वैविध्यपूर्ण व्यवसायांचे समूह तयार करण्याच्या उद्देशाने आम्ही विविध उपक्रमांना प्रोत्साहन देत आहोत.

या पार्श्वभूमीवर, औद्योगिक क्षेत्राचा विस्तार आणि नवीन व्यवसाय अधिक सक्रियपणे विकसित होत असताना, कायदे आणि नियमांचे पालन करणे आणि सामाजिक नीतिमत्तेनुसार कॉर्पोरेट क्रियाकलाप चालवणे अधिकाधिक महत्त्वाचे होत आहे.

कॉर्पोरेट उत्पादनांची गुणवत्ता व वाजवी व्यापार, पर्यावरण, कामगार, सुरक्षा व आरोग्य, जमाखर्च, कर आकारणी, लाचलुचपत प्रतिबंधक, माहिती व्यवस्थापन, इत्यादी विषयांवर विविध कायदे आणि नियम लागू होतात.

आम्ही "KOKUYO ग्रुपची आचारसंहिता" कायम लक्षात ठेऊन आमचे औद्योगिक उपक्रम प्रामाणिकपणे सुरू ठेवू. अशाप्रकारे समाजाला दिलेली आश्वासने पाळत शाश्वत विकास साधण्यास हातभार लावू.

कंपनी आणि इतर सर्वांच्या सुरक्षा व विकासासाठी, कृपया "KOKUYO ग्रुप कोड ऑफ कंडक्ट" चे सार समजून तुमच्या दैनंदिन कार्यांसाठी आधारस्तंभ म्हणून वापर करा.

1 कायदा आणि कंपनी नियमांचे पालन व प्रामाणिक वर्तन

2 मानवी हक्क व व्यक्तिमत्वाचा आदर

3 जागतिक पर्यावरणाचे संरक्षण

4 मुक्त चढाओढ आणि निष्पक्ष व्यापार

5 सुरक्षित व विश्वसनीय उत्पादने आणि सेवा प्रदान करणे

6 कंपनीच्या मालमत्तेचे योग्य व्यवस्थापन आणि बौद्धिक संपत्तीचे संरक्षण

7 योग्य माहिती व्यवस्थापन व वित्तीय अहवाल

8 स्वारस्य संघर्षास प्रतिबंध

9 इनसाइडर ट्रेडिंगला विरोध

10 करमणूक आणि भेटवस्तूंचा योग्य वापर

11 अयोग्य बाह्य विनंतीचा प्रतिसाद

या आचारसंहिते मध्ये, "KOKUYO GROUP" म्हणजे KOKUYO Co., Ltd. आणि "ग्रुप गव्हर्नन्स आधारभूत अधिनियम" हे निर्दिष्ट अधिकारक्षेत्र, मूळ कंपनी गट A, उपकंपनी गट A, आणि मूळ कंपनी गट B मधील कंपन्या इत्यादींचा संदर्भ दिलेला आहे.

KOKUYO GROUP च्या व्यावसायिक क्रियाकलापांशी संबंधित अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कायदे, अध्यादेश, नियम इत्यादींचा संदर्भ या आचार संहितेच्या "कायदा" विभागात देण्यात आला आहे. "अंतर्गत नियम" सामान्यत: KOKUYO ग्रुप आणि KOKUYO ग्रुपच्या प्रत्येक कंपनीला लागू होणारे नियम, विनियमन, कार्यपद्धती, मार्गदर्शक तत्वे इत्यादींचा संदर्भ देण्यात आला आहे

या आचारसंहितेमध्ये, “अधिकारी” हा विभाग कंपनीच्या संचालक आणि लेखा परीक्षकांना सूचित केले आहे. "कर्मचारी" विभाग नियमित कर्मचारी, वरिष्ठ कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, अर्धवेळ कर्मचारी, अर्धवेळ मजूर आणि कंपनीद्वारे नियुक्त केलेल्या इतर व्यक्तींचा समावेश केला गेला आहे.

तुम्ही या आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास, तुमच्यावर कायदा आणि कंपनीच्या नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते.

# 1 कायदा आणि कंपनी नियमांचे पालन व प्रामाणिक वर्तन

## आम्ही कायदे व कंपनीच्या नियमांचे पालन करून, सर्वोच्च नैतिक मानकांसह सद्भावनेने कार्य करू.

### स्पष्टीकरण

- कायदे आणि अंतर्गत नियमांचे पालन करून आम्ही उच्च नैतिक मानके आणि सचोटीने व्यवसाय करावा अशी भागीदारांची अपेक्षा आहे.
- व्यावसायिक क्रियाकलापांना लागू होणारे सर्व कायदे आणि नियम समजून घेण्याचा प्रयत्न करून कंपनीच्या नियम आणि विनियमांचे पालन करावे.
- व्यवस्थापन, व्यवसाय आणि कर्तव्याच्या कामगिरीबाबत निर्णय घेताना माहितीचे अचूक आकलन आवश्यक आहे. समस्या उद्भवल्यास, लवकर प्रतिसाद महत्वपूर्ण आहे. सुरुवातीच्या प्रतिसादामुळे कंपनीच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो. जरी एखादी "वाईट बातमी" असली तरीही, कोणतीही तथ्ये न लपवता तुमच्या वरिष्ठांचा सल्ला घेण्यात यावा.
- दुसऱ्या देशात स्थलांतरित करताना किंवा इतर देशांचा समावेश असलेला व्यवसाय चालवताना, आपण केवळ दुसऱ्या देशाचे कायदे आणि नियमांचे पालन केले पाहिजे असे नाही तर त्या देशाची संस्कृती आणि चालीरीती समजून घेणे आणि त्यांचा आदर करणे देखील आवश्यक आहे.

# मानवी हक्क व व्यक्तिमत्वाचा आदर

आमचा द्वारे वंश, जातीयता, धर्म, राष्ट्रीयत्व, भाषा, लिंग किंवा अपंगत्वाच्या आधारावर भेदभाव केला जात नाही.
आम्ही लैंगिक छळ किंवा अधिकाराचा छळ यासारख्या कोणत्याही प्रकारच्या छळात गुंतणार नाही.
आम्ही बालमजुरी किंवा वेठबिगार मजुरीला परवानगी देत नाही.

## स्पष्टीकरण

- कंपनीच्या अंतर्गत व बाह्य व्यवसायातील प्रत्येक व्यक्तीच्या मानवी हक्कांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा आदर करणे आवश्यक आहे. मानवी हक्कांबद्दलची आपली समज अधिक सखोल करून आपण सुखद कार्यस्थळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- कोणत्याही व्यक्तीची वैयक्तिक माहिती त्यांच्या स्पष्ट पूर्व संमतीशिवाय उघड करू नये.
- लैंगिक टिप्पण्या किंवा शारीरिक संपर्क यासारख्या इतरांना त्रास आणि अस्वस्थता निर्माण करणाऱ्या कृती कधीही करू नये.
- कार्यस्थळी तुमच्या अधिकाराचा वापर कधीही एखाद्याचे व्यक्तिमत्त्व नाकारण्यासाठी किंवा त्यांची प्रतिष्ठा पायदळी तुडवण्यासाठी करू नये.
- बालमजुरी आणि वेठबिगारीला केवळ KOKUYO ग्रुपमध्येच नव्हे तर संलग्न कंपन्या, संस्था इत्यादीं सोबत व्यवहारांमध्येही परवानगी नाही.

# ३ जागतिक पर्यावरणाचे संरक्षण

**एक शाश्वत समाज साध्य करण्यासाठी, आम्ही ग्लोबल वॉर्मिंग आणि वन संसाधनांचा ऱ्हास यासारख्या जागतिक पर्यावरणीय समस्यांवर सक्रियपणे कार्य करू.**

### स्पष्टीकरण

- वैयक्तिक उत्पादन वैशिष्ट्यांप्रमाणे कार्यक्षम वातावरण, तर्कसंगत रचना, हानिकारक रासायनिक पदार्थांचा कमी वापर आणि उत्पादनाच्या जीवनचक्राच्या सर्व टप्प्यांवर (कच्चा माल खरेदी करणे, उत्पादन, वाहतूक, विल्हेवाट इ.) विजेचा कमीत कमी वापर केला गेला पाहिजे.
- वस्तुनिर्माण आणि उत्पादनाच्या ठिकाणी अपघातामुळे किंवा उपकरणांच्या बिघाडामुळे, कच्चा माल, कचरा आजूबाजूच्या वातावरणात विखुरल्यास, त्याचा पर्यावरणावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या गोष्टीची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.
- वस्तूंचे वितरण आणि उत्पादन यासारख्या सेवांच्या तरतुदीमध्ये ऊर्जा आणि संसाधनांच्या वापराबरोबरच, कचरा देखील निर्माण होतो. म्हणूनच पर्यावरणावरील भार कमी करण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे.
- कार्यालय, बांधकाम किंवा उत्पादनाच्या ठिकाणी वीज, पाणी, कागद इत्यादींची बचत करणे आणि कचरा वेगळा करणे आवश्यक आहे. कचऱ्याचे छोटे ढिग वाढून पर्यावरणावर मोठा परिणाम करतात. शाश्वत समाजाच्या प्राप्तीला हातभार लावण्यासाठी आपण या गोष्टींबद्दल जागरूक असणे आणि त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे.

# 4 मुक्त चढाओढ आणि निष्पक्ष व्यापार

## आम्ही मक्तेदारी, निष्पक्ष स्पर्धा आणि निष्पक्ष व्यापाराच्या प्रतिबंधासंबंधी कायदे आणि कंपनी नियमांचे पालन करू. यापासून विचलित करणाऱ्या कोणत्याही कृतीत आम्ही गुंतणार नाही.

### स्पष्टीकरण

- काही देशांमध्ये निष्पक्ष आणि मुक्त व्यावसायिक स्पर्धा सुनिश्चित करण्यासाठी कायदे स्थापन केले आहेत. ह्या कायद्यांचे आणि नियमांचे उल्लंघन केल्याने कंपनीवर मोठा परिणाम होऊ शकतो. म्हणूनच आपण त्यांचे पालन केले पाहिजे.
- बोलीच्या अटी, उत्पादनाच्या किम्मती, उत्पादनाचे प्रमाण, विक्रीचे प्रमाण, शेअर्स इत्यादी परस्पर मुक्त व्यावसायिक क्रियाकलाप प्रतिबंधित करणाऱ्या मुद्द्यांबाबत चर्चा टाळणे आवश्यक आहे.
- सौदेबाजीच्या स्थितीचा फायदा घेऊन किंवा व्यवसाय भागीदार आणि तृतीय पक्ष यांच्यातील विक्री किंमती मर्यादित करून व्यवसायावर प्रतिकूल अटी व शर्ती लादू नये.
- पुरवठादार निवडताना, किंमत, गुणवत्ता, वितरण तारीख, पुरवठा क्षमता, विक्रीनंतरची सेवा, व्यवहार परिस्थिती इत्यादींची तुलना योग्यरित्या केली गेली पाहिजे.
- ग्राहकांची दिशाभूल करणारी अवाजवी निवेदने देऊ नये.

# 5 सुरक्षित व विश्वसनीय उत्पादने आणि सेवा प्रदान करणे

**सुरक्षित व विश्वासार्ह उत्पादने आणि सेवांच्या तरतुदीद्वारे आम्ही ग्राहकांचा विश्वास संपादन करणे आणि त्यांना संतुष्ट करणे सुरू ठेवू.**

## स्पष्टीकरण

- आमच्या ग्राहकांचे आणि त्यांच्या सभोवतालच्या व्यक्तींचे जीवन बदलण्यासाठी विकास, डिझाइन, खरेदी, उत्पादन, विक्री, वितरण आणि समर्थन यासह संपूर्ण मूल्य शृंखलेमध्ये आमच्या व्यवसाय प्रक्रियांना सतत परिष्कृत करताना सुरक्षितता आणि गुणवत्तेचे काटेकोरपणे पालन केले गेले पाहिजे.
- विद्यमान क्षेत्रांव्यतिरिक्त नवीन क्षेत्रांमधील उत्पादने आणि सेवांमधील संबंधित कायदे आणि नियम जाणून आणि समजून घेण्याचा प्रयत्न करून अंतर्गत नियम आणि विनियमनांचे पालन केले पाहिजे.
- उत्पादने आणि सेवांची सुरक्षितता आणि पर्यावरणाविषयी ग्राहकांना अचूक आणि समजण्यास सुलभ स्पष्टीकरण आणि माहिती प्रदान करण्याचे आपले ध्येय असले पाहिजे.

# 6 कंपनीच्या मालमत्तेचे योग्य व्यवस्थापन आणि बौद्धिक संपत्तीचे संरक्षण

**आम्ही कंपनीच्या भौतिक आणि अमूर्त मालमत्तेचे योग्य व्यवस्थापन, संरक्षण आणि वापर करू.**

**आम्ही इतरांच्या बौद्धिक संपत्ती अधिकारांचा आदर करतो.**

## स्पष्टीकरण

- कंपनीच्या भौतिक आणि अमूर्त मालमत्तेचे नुकसान, चोरी, इत्यादी टाळण्यासाठी कंपनीच्या नियमानुसार योग्य व्यवस्थापन केले पाहिजे. कंपनीच्या मालमत्तेचा व्यवसायाव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापर केला जाऊ नये. कंपनीची मालमत्ता कंपनीच्या बाहेर नेऊ नये किंवा परवानगीशिवाय कोणत्याही तृतीय पक्षाला दिली जाऊ नये.
- इतरांच्या बौद्धिक संपदा अधिकारांचा आदर करा व त्यांचे उल्लंघन करू नका. नवीन उत्पादने किंवा नवीन तंत्रज्ञानाचे संशोधन, विकास, डिझाइन, उत्पादन किंवा विक्री करताना, इतरांच्या बौद्धिक संपदा अधिकारांची योग्य प्रकारे तपासणी केली पाहिजे आणि बौद्धिक संपत्तीच्या चोरी संबंधित खटल्यांसारख्या समस्या टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- इतरांची गोपनीय माहिती बेकायदेशीरपणे मिळवू नये किंवा वापरू नये.

# 7 योग्य माहिती व्यवस्थापन व वित्तीय अहवाल

आम्ही प्रामाणिकपणे आणि योग्यरित्या कंपनीचे रेकॉर्ड तयार करून व्यवसायादरम्यान संकलित व प्राप्त केलेली माहिती त्याच्या महत्त्वाप्रमाणे योग्य प्रक्रियेनुसार व्यवस्थापित करू आणि अहवाल देऊ.

लेखा आणि आर्थिक अहवाल तयार करताना, आम्ही वित्त, लेखा आणि कर संबंधित कायदे, नियम आणि कंपनी नियमांचे पालन करू.

## स्पष्टीकरण

- व्यवसायादरम्यान प्राप्त केलेली माहिती योग्य प्रक्रिया व मंजुरीशिवाय कोणत्याही तृतीय पक्षास उघड करू नये. हा नियम अप्रत्यक्षपणे दिलेल्या माहितीलाही लागू होतो. प्रत्येक KOKUYO ग्रुप कंपनीमध्ये अशा माहितीचे अनावश्यक सामायिकरण टाळले गेले पाहिजे. अत्यंत महत्वाच्या माहितीसाठी, इलेक्ट्रॉनिक माहितीसाठी पासवर्ड सेट करून आणि कागदाच्या माहितीसाठी लॉकिंग व्यवस्थापन करून गळती रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

- व्यावसायिक क्रियाकलापांशी संबंधित माहिती कायदे, कंपनी नियम आणि तथ्यांनुसार प्रामाणिकपणे आणि निष्पक्षपणे रेकॉर्ड केली पाहिजे. एखादी माहिती कंपनी किंवा व्यक्तिगतरीत्या गैरसोयीची असेल तरीही कोणतेही विरूपण, खोटेपणा किंवा वस्तुस्थिति लपवली जाऊ नये.

- सर्व व्यावसायिक क्रियाकलाप अखेरीस KOKUYO ग्रुप आणि इतर कंपन्यांसाठी विक्री आणि नफा मिळवून देतात हे ओळखून, योग्य आर्थिक माहिती प्रकाशित करण्यासाठी, आम्ही विक्री-खरेदी, प्रक्रिया खर्च आणि देयके, लेखा प्रक्रिया कंपनीचे नियम आणि तथ्ये यांच्या आधारे योग्यरित्या केले पाहिजे.

- माहिती प्रकटीकरण विभागाच्या परवानगीशिवाय जनसंचार माध्यमांशी वैयक्तिकरित्या संपर्क साधू नये किंवा कंपनीच्या व्यवसायाशी संबंधित चौकशीस प्रतिसाद देऊ नये. हे KOKUYO ग्रुपसाठी हानिकारक असू शकते. याव्यतिरिक्त, घोषणेपूर्वी व्यवसाय कार्यप्रदर्शनाची माहिती, KOKUYO ग्रुपची अज्ञात माहिती, व्यवसाय भागीदार, वाटाघाटी भागीदार आणि व्यवसायादरम्यान मिळालेल्या ग्राहक कंपन्या, अघोषित उत्पादने व सेवांची माहिती, तांत्रिक माहिती इ. गोपनीय माहिती इतर कोणाला पाठवणे प्रतिबंधित आहे.

# 8 स्वारस्य संघर्षास प्रतिबंध

आम्ही कंपनी आणि व्यक्तिगत हिताच्या विरुद्ध कोणत्याही कृतीत गुंतणार नाही. आम्हाला मतभिन्नतेची चिंता असल्यास आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करू.

स्पष्टीकरण

➢ आपल्याकडून कंपनीसाठी कर्तव्य निष्ठेने पार पाडणे आणि कंपनीच्या सर्वोत्तम हितासाठी कार्य करणे अपेक्षित आहे. कंपनीच्या वैयक्तिक हितसंबंधांच्या संघर्षाबद्दल आपल्याला काळजी वाटत असल्यास, वरिष्ठांचा सल्ला घेण्यात यावा.

**<स्वारस्याच्या संघर्षाची संभाव्य उदाहरणे>**

- KOKUYO ग्रुप व्यतिरिक्त इतर कंपनीचे अधिकारी बनणे किंवा कर्मचारी म्हणून रोजगार करारांमध्ये प्रवेश करणे.
- KOKUYO ग्रुप चा विरोधात वैयक्तिकरित्या स्पर्धात्मक व्यवहार करणे किंवा त्यात सहभागी होणे.
- स्वयं, कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, मित्र इ. KOKUYO ग्रुपच्या व्यवहारांचे प्रतिपक्ष अथवा एजंट म्हणून काम करणे.

# 9 इनसाइडर ट्रेडिंगला विरोध

KOKUYO ग्रुप किंवा इतर कंपन्यांच्या स्टॉक ट्रेडिंगशी संबंधित व्यवहारांना प्रवृत्त करणारे कोणतेही इनसाइडर ट्रेडिंग किंवा आचरण आम्ही करणार नाही.

## स्पष्टीकरण

- सर्वसाधारणपणे, इनसाइडर ट्रेडिंग म्हणजे "एखाद्या अधिकारी किंवा कर्मचारी ज्याने त्याच्या नोकरी दरम्यान एखाद्या कंपनीची महत्त्वाची अप्रकाशित अंतर्गत माहिती जाणून घेतली आहे व ती माहिती सार्वजनिक होण्यापूर्वी कंपनीचा स्टॉक खरेदी किंवा विक्री करतो." याशिवाय, कुटुंबातील सदस्य, ओळखीचे लोक इत्यादींना देखील स्टॉकची खरेदी-विक्री करण्यास मनाई आहे.

  KOKUYO ग्रुप कंपन्यांचे संचालक, लेखा परीक्षक, कार्यकारी अधिकारी, सल्लागार, कर्मचारी (नियमित, करार, अर्धवेळ, तात्पुरते आणि इतर कर्मचारी इ.)

- इनसाइडर ट्रेडिंग हे गुंतवणूकदारांसाठी गैर आहे, त्यामुळे KOKUYO ग्रुपच्या एखाद्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला त्याच्या पदामुळे स्वत:च्या व्यवसायाशी संबंधित महत्त्वाची माहिती कळल्यास ती माहिती सार्वजनिकरीत्या प्रकाशित होईपर्यंत उघड करू शकत नाही व कंपनीचे शेअर्स खरेदी किंवा विक्री करू शकत नाही. तसेच, जर तुम्ही "महत्त्वाची अप्रकाशित अंतर्गत माहिती" तृतीय पक्षासमोर उघड केली किंवा त्या माहितीच्या आधारे इतरांना शेअर खरेदी किंवा विक्री करण्याची शिफारस केली, तर तुमच्यावर गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. त्यामुळे फसव्या वर्तनापासून सावध राहणे आवश्यक आहे. ट्रेडिंग करताना, कृपया कायदे आणि नियमांव्यतिरिक्त "KOKUYO ग्रुप इनसाइडर ट्रेडिंग प्रिवेंशन रूल्स" चे अनुसरण करा.

**<माहिती च्या बाबतीत अज्ञात सामग्रीची उदाहरणे>**

- आर्थिक माहिती
- नवीन तंत्रज्ञान संशोधन व विकासाची माहिती
- नवीन व्यवसायाची सुरुवात किंवा व्यवसाय थांबवणे
- शेअर प्रकाशन, संपादन, विक्री किंवा हस्तांतरण करणे
- व्यवसाय चालवताना, कर्जमाफी च्या वेळी झालेले नुकसान

**〈लक्ष्य कंपन्या〉**

- हे नियम KOKUYO ग्रुप कंपन्यांच्या व्यतिरिक्त व्यवसाय भागीदार आणि ग्राहक कंपन्यांना लागू होतात.

# 10 करमणूक आणि भेटवस्तूंचा योग्य वापर

आम्ही सार्वजनिक संस्थांच्या कर्मचाऱ्यांना किंवा सरकारी अधिकाऱ्यांना लाच देणार नाही. कंपनीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि व्यवसायात अडथळा आणणाऱ्या मनोरंजन किंवा भेटवस्तू देणार नाही. आम्ही कंपनीच्या नियमांचे उल्लंघन किंवा व्यवसाय पद्धतींपासून विचलित करणारी करमणूक किंवा भेटवस्तू स्वीकारणार नाही.

स्पष्टीकरण

- काही देशांमध्ये, राजकारणी आणि सरकारी अधिकारी यांचे मनोरंजन करणे व भेटवस्तू देणे कायद्याने प्रतिबंधित आहे. खाजगी कंपन्यांकडून करमणूक आणि भेटवस्तू देणे ही देखील काही प्रकरणांमध्ये लाचखोरी म्हणून ओळखली जाते. या कायदे आणि नियमांचा उद्देश आणि हेतू प्रत्येक देशानुसार भिन्न आहेत. तुम्हाला विक्री क्रियाकलापांमध्ये गुंतणे आवश्यक असल्यास, तुम्ही कायदे, नियम आणि मार्गदर्शक तत्वे तपासून तुमच्या वरिष्ठांना आणि संबंधित विभागांशी सल्लामसलत करून काळजीपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे.
- व्यवसाय भागीदारांकडून मनोरंजन किंवा भेटवस्तू प्रदान किंवा प्राप्त करणे हे कायदा, नियमन, व्यवसाय सराव, सामाजिक अंतर इत्यादींच्या कक्षेत असले पाहिजे. याव्यतिरिक्त, व्यवसाय भागीदारांना "तुम्ही सामाजिकदृष्ट्या शंकास्पद व व्यवसायात अडथळा आणणारी मनोरंजन किंवा भेटवस्तू स्वीकारणार नाही" हे आगाऊ सूचित करण्याचा प्रयत्न करा.
- आचारसंहितेनुसार KOKUYO ग्रुपमध्ये मनोरंजन व भेटवस्तूंची देवाण-घेवाण प्रतिबंधित आहे.

# 11 अयोग्य बाह्य विनंतीचा प्रतिसाद

## आम्ही कोणत्याही प्रकारच्या अवास्तव बाह्य मागण्यांना प्रतिसाद देणार नाही.

### स्पष्टीकरण

- अवास्तव बाह्य आर्थिक मागणीला कधीही प्रतिसाद देऊ नका (पैसे, साहित्य, मासिक सदस्यता, सभेमध्ये सहभाग इ.).
- सामाजिक सुव्यवस्था आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या आणि आर्थिक क्रियाकलापांना बाधा आणणाऱ्या असामाजिक कृती आणि प्रभावाशी आपण संबंध ठेऊ नये.
- बाह्य धमक्या, धाकदपटशा आणि ब्लॅकमेलला बळी पडू नका. जर तुम्ही अशा समस्येला सामोरे जात असाल असाल तर, कृपया ती स्वतःहून सोडवण्याचा प्रयत्न न करता, तुमच्या वरिष्ठ किंवा संबंधित विभागाशी तत्काळ संपर्क साधून योग्य प्रतिसाद कसा द्यावा याबद्दल माहिती प्राप्त करा.